महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : १८९ वे दिनांक : ०३/०७/२०२६ वार : शुक्रवार

## 'ऑफर आली की जायचंच' : राष्ट्रवादीवर संजय शिरसाटांचा घणाघात



**छत्रपती संभाजीनगर :** खासदार अमोल कोल्हे यांनी 'ऑफर आल्यास विचार करू' असे केलेले सूचक विधान आणि त्यापाठोपाठ रोहित पवार यांनी 'कुणीही कुठेही जाणार नाही' असे केलेले स्पष्टीकरण, यावरून शिवसेना नेते आणि आमदार संजय शिरसाट यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. "राष्ट्रवादीमध्ये नेहमीच 'पूर्वेकडे जायचे असेल तर पश्चिमेकडे जाण्याचे' धोरण असते. रोहित पवार हे आपल्या काकांचीच (शरद पवार) भूमिका वठवत आहेत," असा सणसणीत टोला शिरसाट यांनी आजच्या पत्रकार परिषदेत लगावला.

अमोल कोल्हेंच्या विधानावर बोलताना संजय शिरसाट म्हणाले, "अमोल कोल्हे हे शरद पवार गटाचे नेते आणि प्रवक्ते आहेत. त्यांनी जर असे विधान केले असेल, तर त्यांना पक्षाच्या नेतृत्वानेच तसे सांगायला लावले असावे. त्यांच्या या विधानाला नक्कीच एक 'बेस' आहे. त्यांच्या पक्षामध्ये आता ऑफर आली तर युतीत जायचं, हे जवळपास ठरलेलं दिसतंय. राष्ट्रवादी काँग्रेसचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण होण्याच्या चर्चाही अशाच सुरू नाहीत."

रोहित पवारांच्या दाव्याची खिल्ली उडवत शिरसाट म्हणाले, "राष्ट्रवादीचे धोरण नेहमीच उलटे राहिले आहे. त्यांना जर दिल्लीला जायचे असेल तर ते म्हणतात 'मी परभणीला चाललो'. रोहित पवार हे आता याच धोरणानुसार वागत आहेत. 'नाही म्हणायचं आणि ऐन वेळेला जायचं' हे त्यांचं ठरलेलं आहे. त्यामुळे परिवर्तनाची नांदी आणि बदलाचे वारे आता तिथे वाहू लागले आहेत. पक्षात शरद पवारांशिवाय असा कोणताही धुरंधर नेता उरला नाही, ज्याच्या खांद्यावर मान टाकता येईल."

अन्न आणि औषध प्रशासनाकडून (FDA) छत्रपती संभाजीनगरसह राज्यभरात हॉटेल्स, डेअरी आणि मिठाईच्या दुकानांवर सुरू असलेल्या कारवाईचे शिरसाट यांनी स्वागत केले. ते म्हणाले, "तुकाराम मुंढे या एका अधिकाऱ्याने आल्यावर एवढ्या सर्व गोष्टी उजेडात आणल्या, हे खरोखर अभिनंदनीय आहे. पूर्वी याच विभागातले अधिकारी हप्ते वसुली आणि भ्रष्टाचार करून या गोरखधंद्यांना अभय देत होते. आता या कारवाईमुळे व्यापाऱ्यांमध्ये धास्ती बसली आहे. तुकाराम मुंढे यांनी हॉटेल चालकांसो यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांनी हप्ते खाल्ले, त्यांच्यावरही कठोर कारवाई करावी."

राजस्थान पोलिसांनी (ATS) छत्रपती संभाजीनगरमधून 'ISI' शी संबंधित एका संशयिताला ताब्यात घेतल्याच्या घटनेवर शिरसाट यांनी तीव्र चिंता व्यक्त केली. "जेव्हा लालकृष्ण अडवाणी गृहमंत्री होते, तेव्हाच या शहराला 'सेन्सिटिव्ह' घोषित करण्यात आले होते. इथे एटीएसने अतिरेक्यांना मारलेही होते. आता परत या कारवाईमुळे छत्रपती संभाजीनगर अतिरेक्यांचा अड्डा बनत चाललाय की काय, अशी रास्त शंका निर्माण झाली आहे. पाकिस्तान आणि काश्मीरमधील अतिरेक्यांशी डायरेक्ट कनेक्शन असणारे काही लोक इथे आहेत. याच माध्यमातून शहरात ड्रग्जचा व्यवसायही चालतो. पोलिसांनी आणि सरकारने आता डोळ्यात तेल घालून इथे 'सर्च ऑपरेशन' राबवण्याची गरज आहे," अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

## बीड भूसंपादन घोटाळा : बॅकडेट आदेशांवर कारवाई

**मुंबई :** बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२च्या भूसंपादन प्रकरणातील तब्बल २४१ कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्यावर राज्य सरकारने मोठी कारवाई सुरू केली आहे. तत्कालीन जिल्हाधिकारी (लवाद) यांनी बदली झाल्यानंतरही मागील तारखांनी आदेश काढून भूसंपादनाची रक्कम वाढवल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच वितरित झालेली अतिरिक्त रक्कमही वसूल करण्यात येणार असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

आमदार प्रकाश सोळंके, काशिनाथ दाते, राजेश क्षीरसागर, नरेंद्र भोंडेकर, धर्मवीर आत्राम, सुधीर मुनगंटीवार, अमित देशमुख, नितीन पवार आणि मोहन मते यांनी या गैरव्यवहाराबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना बावनकुळे यांनी संपूर्ण प्रकरण सभागृहासमोर मांडले.

महसूलमंत्र्यांनी सांगितले की, राष्ट्रीय महामार्ग कायद्यानुसार भूसंपादनावरील तक्रारींचा निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची 'लवाद' म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. मार्च ते एप्रिल २०२५ या कालावधीत १५४ प्रकरणांची सुनावणी झाली होती. मात्र, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची बीडमधून बदली झाल्यानंतर त्यांनी कथितपणे मागील तारखांनी १५४ आदेश जारी केले. या आदेशांमुळे मूळ ६८ कोटी रुपयांच्या भूसंपादन भरपाईची रक्कम थेट ३१० कोटी रुपयांपर्यंत वाढवण्यात आली. त्यामुळे शासन आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे २४१ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याची गंभीर दखल घेतली.

## बालभारतीच्या पुस्तकातून महाराष्ट्राच्या लोकनृत्यांना डच्चू



**पुणे :** राज्यात एका बाजूला शालेय शिक्षणात 'सीबीएसई' पॅटर्न राबवण्यावर आणि मराठी भाषा सक्तीची करण्यावर भर दिला जात आहे. मात्र, दुसरीकडे शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे महाराष्ट्र आणि मराठी भाषेच्या संदर्भात सातत्याने त्रुटी समोर येत आहेत. आता बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील एका धड्यावरून नवा वाद उफाळून आला आहे. या पुस्तकातील 'लोकनृत्य' या पाठात महाराष्ट्रातील समृद्ध लोककलांना डावलून परराज्यांतील लोकनृत्यांना अधिक महत्त्व दिल्याचे समोर आले आहे.

इयत्ता सहावीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'लोकनृत्य' या पाठात एकूण पाच लोकनृत्यांची माहिती देण्यात आली आहे. मात्र, यामध्ये महाराष्ट्रातील केवळ एकाच दिंडी या नृत्याचा समावेश करण्यात आला आहे. तर, उर्वरित चार लोकनृत्ये ही इतर राज्यांतील आहेत. या पाठातील लोकनृत्यांमध्ये पंजाबचा भांगडा, गुजरातचे रास-नृत्य, बिहारमधील आदिवासी नृत्य आणि छत्तीसगडमधील बस्तर नृत्य यांचा समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्राला लावणी, लेझीम, धनगरी गजा, गोंधळ, कोळी नृत्य आणि पोवाडा यांसारख्या लोककलांची आणि लोकनृत्यांची मोठी व समृद्ध परंपरा लाभली आहे. सहावीतील विद्यार्थ्यांना राज्याच्या या वैभवशाली सांस्कृतिक परंपरेची ओळख करून देणे अपेक्षित होते. राज्याच्या विभागानुसार लोकनृत्यांचा समावेश करता आला असता, परंतु तसे न झाल्याने सांस्कृतिक वर्तुळातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या प्रकारावर ज्येष्ठ साहित्यिक श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अभ्यासकांनी कडक शब्दांत आक्षेप नोंदवला आहे. श्रीपाद जोशी यांनी थेट मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून या प्रकरणात लक्ष घालण्याची मागणी केली आहे. "विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरावर आपल्या राज्याच्या लोकसंस्कृतीची व्यापक ओळख होणे गरजेचे आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने एक 'रिझॉइंडर' (पुरवणी) जोडून पाठ्यपुस्तकात तत्काळ सुधारणा करावी," अशी मागणी या पत्रात करण्यात आली आहे.

या वादग्रस्त धड्याबाबत राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि बालभारती यांच्याकडून अद्याप कोणताही अधिकृत खुलासा करण्यात आलेला नाही, यावरही आक्षेप घेण्यात आला आहे.

बालभारतीच्या पुस्तकातील त्रुटींचा हा पहिलाच प्रकार नाही. यापूर्वी इयत्ता तिसरीच्या पुस्तकात पुण्यातील ऐतिहासिक 'भिडेवाड्या'चा उल्लेख "महाराष्ट्रातील पहिली शाळा" असा करण्यात आल्याने मोठा वाद निर्माण झाला होता. इतिहासकारांनी आक्षेप घेतल्यानंतर, भिडेवाडा ही 'देशातील मुलींची पहिली शाळा' असल्याची दुरुस्ती करण्याची नामुष्की बालभारतीवर ओढवली होती. आता लोकनृत्यांच्या धड्यामुळे राज्य सरकारच्या आणि शिक्षण विभागाच्या धोरणांवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यावर आता शासन काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यभरात शाळा सुरू झाल्या असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासालाही वेग आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीसाठी नवीन अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे. मात्र, याच दरम्यान 'बालभारती'च्या ढिसाळ कारभाराचा एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आला असून, इयत्ता चौथीच्या गणिताच्या नवीन पाठ्यपुस्तकात एक-दोन नव्हे, तर अनेक गंभीर चुका असल्याचे उघडकीस आले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०३ जुलै २०२६

# जिल्हा परिषद शाळा माळीवाडा येथे वृक्षदिंडी उत्साहात



**दौलताबाद (जावेद अहमद)** : कृषी सप्ताहानिमित्त जिल्हा परिषद शाळा, माळीवाडा येथे गुरुवार, दि. २ रोजी सकाळविद्यार्थ्यांनी संपूर्ण गावातून वृक्षदिंडी काढून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी "झाडे लावा, झाडे जगवा" अशा घोषणा देत ग्रामस्थांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती केली.वृक्षदिंडीला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पर्यावरणाचे महत्त्व आणि वृक्ष लागवडीची गरज विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. कृषी सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून पर्यावरण संरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक फिरोज तडवी, पोलीस पाटील प्रमोद साठे,सरपंच ज्योती मुळे, नंदकिशोर मुळे, योगेश आहेर, लता वानखेडे, स्मिता खडके, भगवान बनसोडे तसेच शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ‘भवरा’तून उलगडले ग्रामजीवनाचे वास्तव; ‘पुस्तकावर बोलू काही’ उपक्रमात कथासंग्रहावर सखोल चिंतन




**छत्रपती संभाजीनगर** : ग्रामीण जीवनातील संघर्ष, नातेसंबंधांची ऊब, बदलत्या सामाजिक मूल्यांची घुसमट आणि मातीच्या गंधाने भारलेले मानवी जगणे यांचे अत्यंत वास्तवदर्शी चित्रण करणाऱ्या साहित्यिक विजय जाधव यांच्या ‘भवरा’ या कथासंग्रहावर भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, जिल्हा शाखा, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित ‘पुस्तकावर बोलू काही’ या उपक्रमांतर्गत चिंतनपर चर्चासत्र उत्साहात संपन्न झाले.गांधी भवन, शासकीय ग्रंथालयाजवळ छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. युवराज धबडगे हे होते. कथासंग्रहावर सखोल भाष्य करताना डॉ. अर्चना काटकर यांनी ‘भवरा’ हा केवळ कथासंग्रह नसून ग्रामीण जीवनाचा जिवंत दस्तऐवज असल्याचे सांगितले. शेतकरी, कष्टकरी, उपेक्षित घटकांचे जगणे, परंपरा आणि आधुनिकतेच्या संघर्षात अडकलेला माणूस, गावकुसातील माणुसकीची नाती आणि बदलत्या काळाने निर्माण केलेली सामाजिक विषमता यांचे अत्यंत प्रभावी चित्रण या कथासंग्रहात असल्याचे त्यांनी नमूद केले.त्या पुढे म्हणाल्या की, या कथांमधून ग्रामीण समाजाच्या सुख-दुःखाचे, संघर्षाचे, वेदनेचे आणि आशेच्या धगधगत्या ज्योतीचे दर्शन घडते. गावातील माती, माणसं, त्यांचे भावविश्व आणि जगण्याची तगमग यांचे अत्यंत प्रत्ययकारी शब्दचित्र या कथासंग्रहात उभे राहते.प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे तसेच तिफन त्रैमासिकाचे संपादक तथा तिफनकार डॉ. शिवाजी हुसे यांची उपस्थिती लाभली.अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. युवराज धबडगे म्हणाले, “ग्रामीण साहित्य हे समाजाच्या वास्तवाचे आरसे आहे. खेड्यातील माणसांच्या वेदना, स्वप्ने, संघर्ष आणि संवेदनांना शब्दबद्ध करणारे साहित्य समाजाला विचार देत असते. अशा लेखकांना प्रोत्साहन मिळणे ही साहित्यविश्वाची सामूहिक जबाबदारी आहे.”या प्रसंगी जिल्ह्यातील अनेक साहित्यिक, अभ्यासक आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये डॉ. मोहन सौंदर्य, डॉ. नागेश बोनतेवाड, मच्छिंद्र गोरडे,डॉ. मिलिंद ठोकळ,जिल्हाध्यक्ष सुनील डोके, उपाध्यक्ष विजयकुमार पांचाळ, कोषाध्यक्ष सुनीता कपाळे, सचिव डॉ. दैवत सावंत, संघटक डॉ. संजय शिंदे, सहसचिव माधुरी चौधरी, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक शेवगण, डॉ. संतोष चव्हाण, डॉ. प्रेमला मुखेडकर ,सुनील उबाळे, मधुकर दिवेकर, एडवोकेट कोळकर आणि सौ. कोळपकर, सुप्रसिद्ध साहित्यिक तथा प्रकाशक देवानंद पवार, कैलास पब्लिकेशनचे के .एल. अतकरे,डॉ. गोविंद वाघमारे यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी जिल्हाध्यक्ष सुनील डोके यांनी जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने राज्यस्तरीय ‘अजिंठा-वेरूळ साहित्योत्सव’ २०२६ ची घोषणा केली. महाराष्ट्रातील साहित्यिक, कवी, लेखक आणि अभ्यासकांना एकाच व्यासपीठावर आणण्याच्या उद्देशाने हा महत्त्वाकांक्षी साहित्य उत्सव ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर २०२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.साहित्यिक संवाद, वाचन संस्कृतीची जपणूक आणि नव्या साहित्यकृतींचे चिकित्सक मूल्यमापन यांना चालना देणारा हा उपक्रम जिल्ह्यातील साहित्यिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झाला. ग्रामीण जीवनाचे जिवंत प्रतिबिंब असलेल्या ‘भवरा’ कथासंग्रहावरील या चर्चासत्राने साहित्यविश्वात विचारमंथनाची नवी दिशा निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजयकुमार पांचाळ यांनी केले तर आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

# हिंदू स्मशानभूमी व गोद्री नदी पुलाच्या मागणीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** तालुक्यातील चारठाणा गावातून वाहणाऱ्या गोद्री नदीवर पूल बांधणे व हिंदू धर्मासाठी स्वतंत्र स्मशानभूमी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी वारंवार निवेदन देऊनही जिल्हा प्रशासनाने दखल घेतली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. याबाबत तातडीने कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाव्दारे दिला आहे.

या बाबतीत सविस्तर माहिती अशी की सदर मागणी संदर्भात ७ डिसेंबर २०२२ व ७ फेब्रुवारी २०२३ रोजी तसेच त्यानंतर अनेकदा लेखी निवेदने जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना देण्यात आले आहेत. मात्र आजतागायत कोणतीही ठोस कार्यवाही कींवा हालचाल झाली नाही, असे निवेदनात म्हटले आहे. स्मशानभूमी अभावी व नदीवर पूल नसल्याने चारठाणा व परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास गावाचा संपर्क तुटतो. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही सकारात्मक निर्णय न झाल्याने जनतेत संतापाची लाट उसळली आहे.

या निवेदनानंतरही योग्य ती कार्यवाही न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल. असे ही दिलेल्या निवेदनात असुन या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीस सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहील", असा इशारा दिलेल्या एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांना अर्जदार श्रीपाद जोशी व संदीप जाधव यांनी दिला आहे.

सदर निवेदनाच्या प्रती तहसील कार्यालय जिंतूर, पंचायत समिती जिंतूर व ग्रामपंचायत कार्यालय चारठाणा यांनाही देण्यात आल्या आहेत. दिनांक ३०/०६/२०२६ रोजी हे निवेदन जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात आले.असल्याचे म्हटले आहे.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ०३ जुलै २०२६


## बसव प्रतिष्ठानच्या वतीने डॉ. झाकीर हुसेन उर्दू शाळेत शालेय साहित्य वाटप




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** येथील बसव प्रतिष्ठान अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने दि. ०१ वार बुधवार रोजी डॉ. झाकीर हुसेन उर्दू प्राथमिक शाळेतील इ. १ ते ४ थीच्या सर्व ४५ विद्यार्थी व माध्यमिकच्या २० विद्यार्थ्यांना १० डझन वह्या,जि. प. कन्या प्राथमिक शाळेतील इ. १लि ते ४थीच्या सर्व ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे, आनंदनगर उपसरपंच तबरेज मासुलदार यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी माध्यमिक मुख्याध्यापिका श्रीमती खतीब के. एम., प्राथमिक मुख्याध्यापिका श्रीमती कुरेशी जे. एन., कन्या प्राथमिक शाळा मुख्याध्यापक राठोड एस. एस.,विजयकुमार कोळी, शिक्षक वर्ग शहाजहान पटेल,रिजवान बागवान, जुबेर अत्तार, इम्तियाज जमादार,कानकुर्ती एन. पी , बुशरा सय्यद, बांगी मो. हनिफ , कर्मचारी जोहरबाशा शेख, विजय कांबळे, महेबूब जमादार, राहील सय्यद आदी उपस्थित होते. बसव प्रतिष्ठान च्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती उत्सव निमित्त राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार सोहळाचे आयोजन केले जाते, सण २०२५ पासुन पुरस्कार सोहळा व्यतिरिक्त शालेय साहित्य वाटपाचे उपक्रम राबविण्यात येत असून सण २०२६ मध्ये मुरूम शहरातील ५ शाळा व नाईकगर येथील १ शाळा असे एकूण ७ शाळेतील ५२९ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले असल्याचे अध्यक्ष डॉ. पुराणे यांनी सांगितले.

## जिंतूरच्या अग्रवाल कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मुदत



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यामधील कोल्हा येथील यशवाडी देवस्थान येथे सभा मंडप कोसळून घडलेल्या दुर्घटनेत जिंतूर शहरातील नुमेश अग्रवाल हे मयत झाले असल्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मयत नुमेश अग्रवाल यांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत पाच लाख रुपयाचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी न.प. तील गटनेते सचिन भैय्या गोरे, तहसीलचे मंडळ अधिकारी पठाण साहेब, भाजपा जिंतूर शहर मंडळ अध्यक्ष विलास भंडारे, नगरसेवक किशोर जाधव योगेश काशीकर, याह्या भई, युवा मोर्चा मंडळ अध्यक्ष शैलेश कोठेकर, रोहित देशपांडे, श्रीकांत टाकळकर, केतन अग्रवाल इत्यादी भाजपा पदाधिकारी हजर होते.

## 'वसंतराव नाईकांचे विचार आजही विकासाचा मार्ग दाखवतात'



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : महाराष्ट्राचे शिल्पकार, हरितक्रांतीचे जनक तथा राज्याचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर येथील दिवाणी न्यायालयात अभिवादन कार्यक्रम उत्साहात पार पडला. मा. न्यायाधीश तळणीकर यांच्या हस्ते स्व. नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.प्रास्ताविकपर मनोगतात ॲड. विनोद राठोड यांनी स्व. वसंतराव नाईक यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेतला. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि राज्याच्या विकासासाठी दूरदृष्टीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. अन्नधान्य उत्पादनात महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करण्यासाठी राबविलेल्या प्रभावी धोरणांमुळे हरितक्रांतीला गती मिळाली. रोजगार हमी योजना, श्वेत क्रांती, ग्रामीण विकास आणि शिक्षणाचा प्रसार या माध्यमातून त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केल्याचे राठोड यांनी सांगितले.ॲड. विजयराव देशमुख यांनीही स्व. नाईक यांच्या कार्याचा गौरव करत त्यांचे विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. गजानन नागरे यांनी केले.कार्यक्रमास ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. देसाई मोरे, ॲड. अनिल पवळे, ॲड. मनोज सारडा, ॲड. गोपाल देशपांडे, ॲड.पंकज तिवारी ,ॲड. विष्णू जाधव, ॲड. कपिल निकम, ॲड. सचिन वाघमारे, ॲड. कल्पना दहीभाते, ॲड. पुष्पा उबाळे, वकील संघाचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, न्यायालयीन अधिकारी व कर्मचारी तसेच सार्वजनिक वसंतराव नाईक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रोहित चव्हाण उपस्थित होते.






## पाऊस धारा

रिमझिम रिमझिम
पाऊस धारा
चिंब चिंब झाली
वसुंधरा

खळखळ खळखळ
वाहते पाणी
घरट्यातली चिऊताई
गाते गाणी

सू सू सू सू
सुटला वारा
मोत्यासम पडती
शुभ्र गारा

कड् कड् कड् कड्
विजा चमकती
आकाशी जणू
रोषणाई दिसती

गड् गड् गड् गड्
ढग गर्जती
लपाछपीचा डाव
आपसात खेळती


**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**